# डोळे

देवानी आपल्याला सृष्टी पहाण्यासाठी दोन डोळे दिले आहेत. निसर्गातील रंगसंगती, पक्षी, प्राणी, डोंगर नद्या, वस्तु, पदार्थ, हे व इतरही सगळे आपण त्या डोळ्यांद्वारे पाहतो, अनुभवतो, आनंदतो. ही एक फार मोठी देणगीच आपल्याला मिळालीय. पण मजेची गोष्ट ही की दोन्ही डोळे एकमेकांना आरशाशिवाय पाहू शकत नाही.

ज्या ईश्वरानी आपल्याला डोळे दिलेत त्याला पाहण्यासाठी आपण डोळे बंद करून प्रार्थना करतो. डोळे नसले तर अंधःकारमय जिवन होते. असलेल्या डोळ्यांचा वापर आणखी कसा होतो ते ही पाहू.

कोणत्याहि गोष्टींवर डोळा ठेवणे, डोळा मारणे, डोळ्यात डोळे घालून पहाणे, डोळ्यात अंजन घालणे, दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसत पण स्वतःच्या डोळ्यातले मुसळ न दिसणे, डोळे भरून येणे, कानाडोळा करणे, डोळे वटारणे, डोळ्यातले भाव वाचणे, डोळे हे जुल्मी पण आहेत, बायकोच्या डोळ्याला डोळा भिडवू नये. गंभीर परिणाम होतील.

"जागतिक नेत्रदान दिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!"

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
वृन्दावन हाईट्स
कोथरूड
पुणे.

